अन्न बहु कुर्वीत तद् व्रतम्

महाराष्ट्र शासन
**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**
कार्यालय- नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२२६
ई-मेल comptmpkv@gmail.com
ac2mpkv@gmail.com

पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
ता. राहुरी, जि. अहमदनगर. पिन- ४१३ ७२२.

जा.क्र.मफुकृवि/लेखा-२/कायमस्वरुपी २०% अंशदान/380 /२०२२, दि.:- 9/8/२०२२.

**परिपत्रक**

**विषय :-** विद्यापीठ महसुली उत्पन्न निधीमध्ये सर्व फिरत्या निधींमधून दरवर्षी निश्चीत प्रमाणात कायमस्वरुपी २० टक्के अंशदान (Contribution) घेणेबाबत...

**संदर्भ :-** १. जा.क्र.मफुकृवि/लेखा-२/२०% अंशदान/७९२/२०२२, दि.:- ११/०२/२०२२.
२. जा.क्र.मफुकृवि/लेखा-२/२०% अंशदान/३०/२०२२, दि.:- २०/०४/२०२२.
३. जा.क्र.मफुकृवि/लेखा-२/२०% अंशदान/१४९/२०२२, दि.:- ०३/०६/२०२२.
४.मा. कार्यकारी परिषद ३३५व्या बैठकीतील ठराव क्र. २६/का.प.बै. ३३५ (२३.०६.२०२२)

उपरोक्त संदर्भ क्र. १ ते ३ अन्वये विद्यापीठ महसुली उत्पन्न निधीमध्ये सर्व फिरत्या निधींमधून दरवर्षी निश्चीत प्रमाणात कायमस्वरुपी अंशदान (Contribution) घेणेबावतचे निर्गमित केलेली परिपत्रके अधिक्रमित करण्यात येत आहेत.

संदर्भ क्र. ४ वरील मा. कार्यकारी परिषद ३३५ व्या बैठकीतील ठराव क्र. २६/का.प.बै. ३३५ (२३.०६.२०२२) अन्वये विद्यापीठातंर्गत सर्व कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख/योजना प्रमुख/सर्व अधिदान व लेखा अधिकारी यांना कळविण्यात येते की, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात सर्व फिरते निधींमधून दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी अखेर मुदत ठेवीसह शिल्लक रक्कमेच्या २० टक्के रक्कम विद्यापीठ महसुली उत्पन्न निधीमध्ये अंशदान (Contribution) स्वरुपात घेणेकरीता, तसेच सन २०२२-२३ आर्थिक वर्षापासून पुढे सर्व फिरते निधींतून जमा (Receipt) रक्कमेच्या २० टक्के रक्कम विद्यापीठ महसुली उत्पन्न निधीमध्ये अंशदान (Contribution) म्हणून घेणेकरीता कार्यकारी परिषदने महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम ३१ (८) अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

**उपरोक्त नमूद कार्यकारी परिषदेतील ठरावानुसार सर्व अधिदान व लेखा अधिकारी यांनी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात सर्व फिरते निधींमधून दिनांक ३१ मार्च, २०२२**

कृ. मा.प.

रोजी अखेर मुदत ठेवीसह शिल्लक रक्कमेच्या २० टक्के रक्कम विद्यापीठ महसुली उत्पन्न निधीमध्ये अंशदान (Contribution) स्वरुपात घेणेबाबत कार्यवाही दि.१२/०८/२०२२ पर्यंत करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

तसेच, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून पुढे सर्व फिरते निधींतून जमा (Receipt) रक्कमेच्या २० टक्के रक्कम विद्यापीठ महसुली उत्पन्न निधीमध्ये अंशदान (Contribution) होणेबाबत प्रतिवर्षी या परिपत्रकानुसार माहे जुलैमध्ये कार्यवाही करावी व तसा अहवाल वेळोवेळी दरवर्षी या कार्यालयास सादर करावा.

(बापुसाहेब भाकरे)
नियंत्रक,
मफुकृवि, राहुरी.

प्रत कार्यवाहीस्तव :-

१. सर्व विभाग प्रमुख/योजना प्रमुख/कार्यालय प्रमुख.
२. सर्व अधिदान व लेखा अधिकारी.
३. सर्व आहरण व संवितरण अधिकारी.
४. स्वीय सहायक, मा.कुलगुरु महोदय यांचे कार्यालय मफुकृवि, राहुरी यांना माहितीसाठी.